# उस्मानाबाद जिल्हयातील बंजारा समाजाचे सांस्कृतिक जीवन

**संशोधक विद्यार्थी**
**रमेश बाबूराव राठोड**
सुदर्शन माध्यमिक आश्रमशाळा,
सत्तरधरवाडी
ता. औसा जि. लातूर

**मार्गदर्शक**
**प्रा.डॉ. ओमशिवा विश्वनाथ लिगाडे**
इतिहास विभाग प्रमुख
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव
ता. चाकूर जि. लातूर

**प्रस्तावना**

बंजारा भाषा आणि संस्कृती जुळ्या बहिणीसारख्या बरोबरच वाढतात. बंजारा समाजाचे आचार, विचार, रूढी, परंपरा आणि चालीरिती, भोग, नसाब, हसाब, बळीप्रथा, सामाजिक रितीरिवाज, वैयक्तिक व्यक्तीचे पस्पर संबंध, वेशभूषा, पोषाख, आहार इ. परंपरा या सर्वांचा सांस्कृतिकजीवनात समावेश होतो. त्याचबरोबर समाजाचे वैचारिक आदान-प्रदानाचाही संस्कृतीत अंतर्भाव होतो. संस्कृतीच्याअंगानेच भाषा वाढते. आपल्या व्यक्तिगत कुटुंबात आणि समाज जीवनात आपण काही परंपरा निर्माण करतो. त्याचबरोबर राहणीमानाचे काही संकेत निर्माण करतो. बंजारा समाजाचे व्यक्ती आपल्या संस्कृतीची वाटचाल बहुतेक भाषेतच व्यक्त करतात. क्वचित प्रसंगी आपल्याला पुराण, इतिहासाचा आधार घ्यावा लागतो. त्यामुळे आपले आचारविचार व संकेत पुढच्या पिढ्यांच्या स्वाधीन करू शकतो.

पृथ्वीच्या उत्पत्तीचा जगाच्या स्थिती, गतीचा आणि नियंत्रणकरणारी सर्वश्रेष्ठ शक्तीच्या अस्तित्वाचा, माणसा-माणसातील नात्यांचा संबंधाचा, भौतिक पदार्थांच्या गुणधर्माचा आणि आपण निर्माण केलेल्या सामाजिक संस्थेच्याउपयुक्ततेचा आम्ही विचार केला. त्यातून शस्त्रे निर्माण झाली आणि हे सर्व एक दुसऱ्याला कळावे व सांस्कृतिकजीवन सोयीचे होण्यासाठी आपण भाषा तयार केली म्हणा किंवा झाली म्हणा समाजात नव्या संकल्पना, नवे विचार मांडण्यासाठी भाषेतही बदल करावे लागतात. नव्या भाषेची सरमिसळ त्यामध्ये होते. समाजाची वैचारिक पातळी जेवढी समृद्ध होईल. तेवढी त्या समाजाच्या भाषेतही भर पडते, या प्रक्रियेने गोरबोली अस्पष्ट झाली आहे.

तांड्यातील वातावरण यापूर्वी अत्यंत निर्मळ व सुखा-समाधानाने राहावयाच्यालायकीचे होते. तांड्यातील भांडण-तंटे तांड्यातच मिटविल्या जात होते. नायकाने सांगितलेले शब्द प्रमाण मानत असत. एखाद्या सणाच्या अगोदर घरातील व्यक्ती मृत्यू पावली की, त्याच्या घरासमोर सर्व बंजारालोक सणाच्याआदल्या दिवशी एकत्र येतअसत आणि त्या कुटुंबाचे सांत्वन करूनच तांड्यात सण साजरा करण्याचे नायकाच्या माध्यमातून ठरवत असत.

**कला कौशल्य :**

बंजारा हस्तकला बंजारा लोकांचा अविभाज्य भाग बनलेला दिसून येतो. संस्कृती आणि निसर्ग कला यांचा सुरेख संगम त्यांच्या जीवनात पहावयास मिळतो. फार पुरातन आदिम संस्कृतीचासांस्कृतिक जीवनाचा अभ्यास देखील या कलात्मकतेच्या माध्यमातून करता येतो.

बंजारा स्त्रियांची केसभूषा, वेशभूषा, आभूषणे, झोपड्या, घरांची बांधणी, रंगकाम, भिंतीवरील चित्रे, भांडी, अवजारे, शस्त्रे, विणकाम, भरत काम, काशिदाकारी, हस्तकला, ढेरो आदीठिकाणी बंजारा लोकांची कलात्मक दृष्टी प्रकट होते. सतत लदेणी व्यवसाय करत असल्यामुळे भटकंती अथवा एखादा माणूस किंवा सुटलीच तर परत त्याच प्रदेशात आल्यानंतर त्याला ओळखता यावे म्हणून बंजारा समाजातील स्त्रिया आणि पुरूष शरीरावर गोंदणीकरून घेत असतात.

स्त्रियाकेशभूषा करताना केसांना वेगवेगळ्या प्रकारचे आळेपिळे त्या देतात. अशा केसांवर आरसे लावून त्यांवर सोन्या-चांदीचे दागिन्यांनी त्या सजवतात.केसाच्या वेण्या चेहऱ्यावर सोडून सारा चेहरा त्या झाकून घेत. या बंजारांचीचालण्याची गती मोठी विलक्षण असे, वेगवान आणिझपाट्याची दिसून येते.

*" लमाणी चालले झपाट्यानी आणिफुफाटा उडतो वहाणांनी "*

**बंजारा स्त्री हस्तकला**

या समाजातील स्त्रियांना कोणतेही प्रशिक्षण घेतलेले नसताना अतिशय चांगल्या पद्धतीने लमाणी आदिवासी हस्तशिल्पाचे काम करण्याचा वसा यथायोग्य चालवीत आहेत.कोतळी, कोतळो, बरचट खोळी, झोळना, गळणो, फुलीया, दराणी, देवेर कोतळो, खलची फुलीया गाला, कसोट्या, गबतणी, फुलारडोर, मुंगा, आरी, चीड, सडके, फेटीया, काचळी, वळटो टेको, पारा, कोडी हे लावून कसोटयाची झुंडी लावून हातात कोफ्या म्हणून वापरतात त्यामध्ये खिल्लन वेल, जाळीचा टाका, कळेणी,गाडरटाका, काचे, शेवटी फुंदा (गोंडे), कोतळीर डोर (तोंड बांधण्यासाठी दोर) याचा उपयोग नवरदेवाची वरात आल्यानंतर त्यांना त्यांचे सामान ठेवण्यासाठी सुबक प्रमाणात कोतळीचा उपयोग होतो.बंजारा स्त्रियांचा साजशृंगाराच्या विविध वस्तू इत्यादी बंजारा हस्तकलेचे चित्रण करणा-या आकर्षक व उपयोगी वस्तू आहेत. आज बंजारा वेशभूषा अनेक चित्रपटसृष्टीमध्ये त्याचा उपयोग करताना दिसून येत आहे.

बंजारा लोक जनावरांच्या कातडी पासून बनविलेला डफ, नगारा, ढोल, बांबूपासून बासरी इत्यादीप्रकारचेसंगीत वाद्य बनवतात. बंजारा समाजाचा इतर शहरांशी संपर्क वाढल्यामुळे कलात्मक वस्तुंची निर्मिती व कौशल्य यालाही चालना मिळत आहे. ढालिया, दडीची विविध कलात्मक वस्तू, पोळ्याच्या सणाला बैलासाठी बनविण्यात येणारे बाशिंग, कासरा, पिके, खाऊ नये म्हणून मुसका, होळीच्या फाग (धुलीवंदन) करीता लागणारे विविध सोंगाच्या वस्तू, मासेमारी करीता लागणारे जाळे, आकर्षक लाकडी वस्तू, ज्वारीच्या भाकरी करण्यासाठी लाकडी फळी (काटवट) आकर्षक मुसळ, शंकरपाटाकरीता लाहनसा कातीव छकडा, बैलगाडी, शेंगा बडविण्यासाठी मुंगारी, शेतीचे विविध अवजारे ही बंजारा समाजाची परंपरागत कलात्मक हस्तकलेची प्रतिक आहे.

**1. कला जीवन** : बंजारा समाज हेभटकंती अवस्थेत असला तरी त्यांच्याकडे अनेक कला अवगत आहेत. घरे निर्माण करणे, कोठारे, स्नानगृहे, गायबैलांची जागा, मंदिरे, घरांची आदर्श रचनाइत्यादी कला कौशल्य त्यांनाअवगत आहेत.

**2. स्थापत्य कला** : बंजारा समाजाच्या घरांचा आकार लहान होता. तांडेही लहान होती. पुढे जसजशी आर्थिक व वैज्ञानिक प्रगती होऊ लागली तशीतशी अनेक गोष्टींचा उदय होऊलागला. बंजारा समाज स्थिर झाल्यानंतर आपआपल्या कुवतीप्रमाणे घराची निर्मिती करू लागले. शयनकक्ष, स्वयंपाकगृह कोटीगृह असे मोठ्या घराची नवनवीन रचना असत.

आज या समाजामध्ये वैचारिक प्रगती झालेली दिसून येते. पिढ्यानपिढ्या चालत आलेली लोप पावत चाललेली आहे. पाश्चिमात्त्य संस्कृतीचा स्विकार केल्याने हा समाज आता चौफेर बनला आहे.

**3.मनोरंजन** : बंजारा समाज हाभटकंती अवस्थेत असतांना त्यांनी आपल्या मनोरंजन व करमणुकीच्या साधनात नृत्य व संगीत यांना अनन्यसाधारणमहत्त्व होते. स्त्री-पुरूषांचे विविध खेळ व कला अवगत होते. उदा. नृत्य, गाणी व विविध प्रकारचे खेळ खेळले जात असत. पुरूषमंडळी कबड्डी, कुस्ती, मलखांब, कसरत, दगडाचे गोटेउचलणे, पंजा लढवणे, विटीदांडू, पोहणे, धावणे, नृत्य, गायन, विविध वाद्य वाजवणे, भजनं इत्यादी कला बंजारा समाजातील लोकांना अवगत असत. त्याचप्रमाणे लहान मुले सुद्धा लपाछिपी, फुगडी, कबड्डी, सूरपाट, क्रिकेट,विटीदांडू, लंगडी, तसेच नाचगाणे, चिखलाची घर बनवणे, गाडी बनवणे, पशु-पक्षी यांची मूर्ती बनवणे इ. कला मनोरंजनासाठी बंजारा समाजातील स्त्री-पुरूषांसाठी उपयुक्त ठरत असत.

प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये उस्मानाबाद जिल्ह्यातील बंजारा समाजाचे सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करण्यात आला असून त्यामध्ये बंजारा समाजाचे आचार, विचार, रूढी, पंरपरा,चालीरिती, भोग, नसाब, हसाब, बळीप्रथा, सामाजिक रितीरिवाज,वेशभूषा, पोषाख व आहार इत्यादी सांस्कृतिक घटकांचा ऊहापोह करण्यात आलेला आहे.

**संदर्भ**

1. चव्हाण मोहन लक्ष्मणराव, बंजारा बोली भाषा एक अध्ययन, प,. 43
2. पवार प्रमोद मनोहर,(2016)- बंजारा समाज : राजकीय आणि सामाजिक सहभाग, द्वितीय आवृत्ती, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, पृ. 137
3. चव्हाण मोहन लक्ष्मणराव, बंजारा बोली भाषा एक अध्ययन, पृ. 17
4. पाटील बळीराम, गोर बंजारे लोकांचा इतिहास, पृ. १३
5. राठोड मोतीराज, बंजारा लोकसाहित्य मे समाज संस्कृती, पृ. 60
6. राठोड मोतीराज, बंजारा लोकसाहित्य मे समाज संस्कृती, पृ. 61
7. कैबर लेग एन.आर., सम अकाऊट ऑफ ओरिजनल हिस्ट्री ऐड मैनर्स ऑफ मैन काल्ड बंजाराराज, पृ. 72
8. राठोडदिपक, क्रांतिकारी लमाणी बंजारा समाज... रंजक माहिती, संस्थापक अध्यक्ष, वसंतराव नाईक प्रतिष्ठान,औसा.
9. https://khaasre.com/revolutionary-banjra/